


# उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह

## Recent Trends in Higher Education

अथर्व
पब्लिकेशन्स

Scanned with CamScanner

# उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह

**Recent Trends in Higher Education**


**• मुख्य संपादक •**

प्राचार्य डॉ.वसंत श्रावण देसले

कै. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील

कला महाविद्यालय, मारवड, ता. अमळनेर, जि.जळगाव (महाराष्ट्र)

**• संपादक •**

प्रा.विश्वनाथ डी.पाटील

प्रा.डॉ.संजय एस.पाटील

प्रा.डॉ.दिलीप टी.कदम

प्रा.संजय.पी.महाजन

प्रा.पवन सी.पाटील

प्रा.जितेंद्र ए.माळी

**• सहसंपादक •**

प्रा.माधव के.वाघमारे

प्रा.नंदा पी.कंधारे

प्रा.सतीश एच.पारधी

प्रा.विजयकुमार बी.पाटील

प्रा.किशोर एन.पाटील



अथर्व पब्लिकेशन्स्



Scanned with CamScanner

अथर्व पब्लिकेशन्स्

उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह
Recent Trends in Higher Education

© सुरक्षित

**ISBN - 978-93-84093-89-1**

**प्रकाशक**
युवराज भटू माळी
**अथर्व पब्लिकेशन्स्**
**: धुळे :**
१७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे - ४२४००१
**भ्रमणध्वनी :** ९४०५२०६२३०
**: जळगाव :**
तळमजला, ओम हॉस्पिटल
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी,
जळगाव ४२५ ००१
फोन : ०२५७-२२३९६६६, भ्रमणध्वनी : ९७६४६९४७९७
**web :** **www.atharvapublications.com**
**Email :** info@atharvapublications.com,
atharvapublications@gmail.com

**प्रथमावृत्ती :** ११ फेब्रुवारी २०१५

**अक्षरजुळवणी**
सौ.हर्षाली अ. भंगाळे
मो.९९२२९२४६८५

**मूल्य : ₹ ५००/-**

*या पुस्तकातील कोणत्याही भागातील पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी-फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.*

५६. भारतातील उच्च शिक्षण : एक दृष्टीक्षेप
– प्रा.डॉ.हिरालाल वामन चव्हाण ........ १६९

५७. उच्च शिक्षणातील बदलांचे प्रवाह
– प्रा.प्रमोद रमेश पाटील........ १७१

५८. भारतातील उच्च शिक्षणाची सद्य:स्थिती
– प्रा. माधव केरबा वाघमारे........ १७४

५९. जागतीकीकरण व शिक्षणातील बदलती परिस्थीती: विश्लेषण
– श्री.संजय वामनराव भोळे........ १७८

६०. आजच्या शिक्षणापुढील आव्हाने
– प्रा. भगवान ईश्वरलाल परदेशी ........ १८०

६१. जागतिकीकरणाचा उच्च शिक्षणावरील प्रभाव
– प्रा. विजय शालिग्राम गाढे........ १८३

६२. उच्च शिक्षणात स्त्रीयांचा सहभाग व समस्यांचे उपाय
– प्रा. सुजाता आत्माराम निकम ........ १८५

६३. भारतीय उच्च शिक्षणातील समस्या आणि उपाययोजन
– प्रा.डॉ.विवेकानंद लक्ष्मण चव्हाण ........ १८८

६४. भारतीय उच्च शिक्षणापुढील आव्हाने
– प्रा.डॉ. आनंदा बाबुराव सोनवणे........ १९१

६५. उच्च शिक्षणात ई – अध्ययनाची भुमिका
– श्री. प्रभाकर पी. चौधरी........ १९५

६६. उच्च शिक्षणातील बदलांचा आढावा
– प्रा. नितीन साहेबराव जाधव........ १९८

६७. आधुनिक ग्रंथालयांमध्ये इंटरनेटचा उपयोग
– योगेश माधवराव बोरसे, चेतन मोरे ........ १९९

६८. उच्च शिक्षणातील समस्या
– प्रा.दिनेश साहेबराव खंडारे........ २०२

६९. भारतात उच्च शिक्षणातील खाजगीकरण : समस्या आणि उपाययोजना
– प्रा.डॉ.जी.एच.निकुंभ, प्रा.नितीन वना जाधव........ २०५

७०. उच्च शिक्षणातील समस्या, आवाहने आणि उपयुक्तता
– पंकज चुडामण पाटील ........ २०८

७१. भारतातील उच्च शैक्षणिक ग्रंथालयातील उद्योन्मुख संसाधने
– प्रा. विजयकुमार बी. पाटील ........ २१२

७२. जागतिकीकरणात उच्च शिक्षणाची भूमिका
– प्रा. एस. के. महाजन ........ २१४

७३. उच्च शिक्षणातील बदलांचा चिकित्सात्मक आढावा
– प्रा. अरुण अवचितराव पाटील ........ २१६

Scanned with CamScanner

# जागतीकीकरण व शिक्षणातील बदलती परिस्थीती; विश्लेषण

– श्री.संजय वामनराव भोळे
सहा.प्राध्यापक, आ.र.भा. गरूड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी ता.जामनेर जि. जळगांव

**प्रस्तावना :**

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि २६ जानेवारी १९५० ला या देशाची राज्यघटना अस्तित्वात आली. स्वातंत्र्यपुर्व काळात भारतात असलेली विषमतेची दरी सर्वच स्तरावर होती. तसेच शिक्षणाच्या बाबतीतही कमालीची उदासीनता आणि प्रचंड मोठी विषमतेची दरी होती, म्हणून भारतीय स्वातंत्र्याला लढ्यात ज्यांनी महत्वाची भुमिका बजावली त्यामध्ये म.गांधी, पं. नेहरू., डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहु, फुले यांनी सामान्य जनतेला राजकीय स्वातंत्र्या बरोबर, सामाजिक स्वातंत्र मिळवून देण्यासाठी सक्रीय प्रयत्न केले. आणि महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या दाम्पत्यांनी सर्वच स्तरातील लोकांसाठी शिक्षणाची दारे खुले करून दिले. याला पूर्णत्व आणण्यासाठी २६ जानेवारी १९५० रोजी आमंलात आलेल्या राज्यघटनेत शिक्षण हा भारतीय नागरीकांचा मुलभूत हक्क म्हणून नमुद करण्यात आला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला वाघीनीचे दुध म्हटले आणि अन्याय निवारणासाठी त्याची खुप आवश्यकता असल्याचे ठणकावुन सांगितले, तसेच म.फुले यांनी अज्ञात हे सर्व दु:खाचे मूळ आहे हे पटवुन दीले. यावरूनच आधुनिक काळात देखील त्याचे महत्व दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे. परंतु आज भारताने स्विकारलेल्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे भारताला सर्वच दृष्टीकोनातून स्पर्धेला स्विकारावे लागले आणि १९९१ नंतर भारत हा वास्तविक रितीने विकासाच्या दृष्टीने स्पर्धेत उतरून प्रयत्न करतांना दिसून येतो. परंतु स्पर्धेच्या प्रक्रियेत समाविष्ठ असतांना भारताला काही समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याचा ही आढावा घेण्यासाठी शिक्षण हा घटक समोर ठेवुन प्रस्तुत संशोधन लेखामध्ये त्याबाबत विवेचन करण्यात आले आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे :** १. शिक्षणातील बाजारीकरण स्पष्ट करणे. २. शिक्षणव्यवस्थेतील वाढता राजकीय हस्तक्षेप स्पष्ट करणे. ३. उच्चशिक्षणाचे घसरते प्रमाण स्पष्ट करणे. ४. उच्चशिक्ष्णाबाबत शासनाची उदासीनता स्पष्ट करणे. ५.जागतीकी करणामुळे निर्माण झालेली आव्हाणे यांचा आढावा घेणे. ६. खाजगी विद्यापीठांचा शिक्षणावरील परिणाम स्पष्ट करणे. ७. उच्चशिक्षणाचे भवितव्य स्पष्ट करणे.

**जागतिकीकरणाचे उच्चशिक्षणावरील परिणाम :** भारतामध्ये उच्चशिक्षणाच्या बाबतीत कमालीची उदासीनता व शैक्षणीक विषमता आज दिवसेंदिवस वाढतांना दिसत आहे. त्यामुळे उच्चशिक्षणावर जागतिकीकरणाचा काय बरा वाईट परिणाम झाला आहे. याचा आढावा घेणे गरजेचे आहे. उच्चशिक्षणातील घटते प्रमाण आणि जागतिकीकरणाला सामोरे जाणारी शिक्षणव्यवस्था याबाबत आज सर्वच पातळीवर चर्चा होणे गरजेचे आहे. म्हणून जागतिकीकरणाचे उच्चशिक्षणावरील परिणाम दिसुन येतात त्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**१. उच्चशिक्षणाचे बाजारीकरण :** जागतिकीकरणामुळे सर्वच स्तरावर बाजारीकरणाचे स्वरूप आले आणि इतर घटनामध्ये बाजारीकरणाने प्रवेश केला व आज बड्या धनाढ्य व सातकेंद्रीत लोकांच्या दावणीला उच्चशिक्षण व्यवस्था बांधली गेली. यामुळे महात्मा फुले, राजर्षी शाहुमहाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा दुरदृष्टी शिक्षणाचा दृष्टीकोन बाजुला राहुन मुठभर लोकच शिक्षण घेतांना दिसत आहेत.

**२. केंद्रीयविद्यापीठ आणि राज्याची विद्यापीठ यात केंद्र सरकारकडून होणारा भेदभाव :** आज मोठ्याप्रमाणात शिक्षण क्षोत्रात भेदभाव दिसून येतो व केंद्रीय विद्यापीठे आणि राज्याची विद्यापीठे असा केंद्रसरकारकडून राज्यातील विद्यापीठांना समानतेची वागणूक मिळत नाही. त्यामुळे शिक्षणाबाबत एककेंद्री विकासाचा दृष्टीकोन देशपातळीवर विकसीत होतांना दिसत नाही.

**३. वाढता राजकीय हस्तक्षेप व विद्यापीठांची धोक्यात आलेली स्वातंत्र्यता :** शिक्षण क्षेत्र हे राजकीय हस्तक्षेपापासून किंवहुना त्यांच्या अधिक प्रभावापासून अलिप्त असायला हवे पण तसे होताना दिसत नाही.त्यामुळे शिक्षणक्षेत्रात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतांना दिसत आहे.



Scanned with CamScanner

**४. शासनाचा शिक्षणाबाबत योग्य धोरणांचा अभाव :** आज महाराष्ट्रासारख्या पुरोगामी समजल्या जाणाया राज्यातसुद्धा शिक्षणाबाबत योग्य धोरणे आखली जातांना दिसत आहे. कारण उच्चशिक्षणाबाबत शासनाची कमालीची उदासीनता दिसून येत आहे. ऑक्टो २०११ साली खाजगी विद्यापीठांना देणारे विधेयक महाराष्ट्राच्या विधीमंडळाने मंजूर केले आणि विधीमंडळात कोणतीही चर्चा न होता ते विधेयक मंजूर झाले.

याचा अर्थ जागतिकीकरणाच्या वाटचालीत उच्चशिक्षणाला समस्येच्या गर्तेतुन बाहेर काढण्यासाठी त्यातील प्रश्नांवर साकल्याने चर्चा होण्याची गरज आहे. ती आजही होतांना दिसत नाही. आज जागतिकीकरणाच्या वाटचाली ज्ञान संपादन व उच्चशिक्षणाचा वाढता रेषो या बाबी मागे पडुन उच्च शिक्षणाला राजकीय स्तरावरदेखील बाजारू स्वरूप आल्याचे दिसते आहे. आणि आज मोठ्याप्रमाणावर विना अनुदानित महाविद्यालये, व्यावसायीक शिक्षण यांना परवानगी देतात बाजारू स्वरूप आले आल्याचे दिसते आहे.

**५. खाजगी विद्यापीठांचे प्रस्थ :** खाजगी विद्यापिठांनी आपले ठाण मांडल्यामुळे यामध्ये केवळ पैसा असणारा धनिक वर्ग तग धरतोय आणि सामान्य नागरीक उच्च शिक्षणाच्या संधीपासुन बाहेर फेकला जातो. आर्थिक उदारीणामुळे औद्योगिकीकरणाचा वेग वाढला व सेव क्षेत्र विस्तारून मागणी तसा पुरवठा या बाजारपेठेतील तत्त्वाप्रमाणे शिक्षणाचे स्वरूप झाले आहे.

६. विदेशी विद्यापिठांची भारतातील आगमन व अभिमत विद्यापीठे व मुक्तविद्यापीठांचा दुरशिक्षण कार्यक्रम मोठ्या प्रमाणात वाढून १९९० नंतर ९० विद्यापीठांना केंद्रसरकारने काहीच विचार न करता मान्यता देवुन शिक्षणात केवळ संख्यात्मक वाढ करून गुणात्मकदृष्ट्या घसरण केल्याच दिसुन येत आहे. असे प्रा.पी.एन.लंडन या समितीने सांगितले आहे.

ही भारतातील उच्चशिक्षणाबाबतची कमालीची उदासीनता आज केवळ जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत वाहुन घेतल्यामुळे दिसून येत आहे.

**उच्चशिक्षणातील २१ व्या शतकातील सुधारणेसाठीचे उपाय :**

१. उच्चशिक्षणाबाबत शासनाने केवळ संख्यात्मक नव्हेतर गुणात्मक दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. २.शिक्षणतील उद्देश हा राज्यहिताचा उद्देश झाला पाहिजे. ३. शैक्षणीक धोरणाला केवळ रजकारणी व IAS ठरवतात तसे न होता शिक्षकाच्या मताला महत्व असावे. ४. शैक्षणिक स्तरावरील सरकारचा अवाजवी हस्तक्षेप कमी व्हावा. ५. शैक्षणीक शूत्यरचना बाबत योग्य नियमावली शासकीय पातळीवर ठरावी. ६. आरक्षणाबाबत स्पष्टता व गरजेनुसारच आरक्षण द्यावे. ७. उच्चशिक्षणातील घटकांची एक लॉबी किंवा दबावगट तयार घेणे काळाची गरज आहे. ८. सत्ताधारी वर्गातील हितसंबध शिक्षणाच्या खाजगीकरणा बाहेर आले पाहिजे.

**निष्कर्ष :**

एकंदरीतच जागतिकीकरण ही जरी विश्वाशी एकता निर्माण करणारी, राष्ट्रातील लोकांना जागतिक स्पर्धेशी जोडणारी प्रक्रिया म्हणून भारताने जरी स्विकारली असली तरी स्वातंत्र्यानंतर भारताचा फार झपाट्याने विकास झालेला नाही. तसाच १९९१ च्या जागतिकीकरणानंतरही फारसा विकास इतर क्षेत्रात जसा झाला नाही. तसा उच्चशिक्षणातही फारसा विकास झालेला नाही. या उलट उच्चशिक्षणतील गुणत्मक रेषो कमी होऊन. उच्चशिक्षणाचे प्रमाण देखील उत्पन्न असल्याचे दिसून येतात. म्हणून येणाऱ्या काळात भारताच्या महासत्तेची स्वप्ने पाहताना शिक्षणासारखा महत्वपूर्ण घटक मागे ठेवुन ही स्वप्न पुर्ण होणार नाहीत. हे वरील स्पष्टीकरणातुन दिसून येते.

**संदर्भ :**


- समाजप्रबोधन पत्रिका – अंक १९८ ऑक्टो डिसे २००७
- Darj - Raesearch Jaurnal - July/December 2010
- समाजप्रबोधन पत्रिका अंक १९६ – ऑक्टो/डिसे. २०११
- जागतिकीकरण नवीन गुलामगिरी – एडमिरल विष्णु भागवत समता प्रकाशन नागपुर आक्टोबर २००७
- सुवर्ण महोत्सवी वर्ष महाराष्ट्र वार्षिक अंक २०१० – संपादक – तुकाराम जाधव
- लोकशाही : एकचिंतन संपादन दिलीप सुरवाडे : लोकसाहीत्य प्रकाशन औरंगाबाद मे २०१०
- भारतीय लोकशाही – अर्थ आणि व्यवहार –राजेंद्र व्होरा –सुभाष पळशीकर डायमंड पब्लीकेशन पुणे २०१०


••••



Scanned with CamScanner

भारत जगातील एक महासत्ता बनणार असल्याचे विद्वान संशोधक व इतर विविध क्षेत्रातील तज्ज्ञांकडून बोलले जात आहे. मात्र एकविसाव्या शतकात वावरतांना अनेक गोष्टींचा शोध घेणे आवश्यक आहे. सर्वच क्षेत्रात बदल होत असतांना शिक्षण क्षेत्रात नेमके कोणते बदल होतील त्याचे परीणाम काय होतील ? हे आणि असे अनेक प्रश्न आपल्यासमोर आहेत. माहिती आणि तंत्रज्ञानामुळे जग खूपच जवळ आले आहे. ई-मेल, इंटरनेट, एस.एम.एस. व्हॉटस् ॲप इत्यादी सारखे शब्द बालपणापासूनच विद्यार्थ्यांना परिचीत झाले आहेत. ई-लर्निंग, व्हर्च्यूअल क्लास रुम, व्हर्च्यूअल युनिर्व्हसिटी तंत्रज्ञानाधारित अशी साधने उदयाला आल्यामुळे शिक्षणाचे आधुनिकीकरण झाले आहे. तेव्हा अशा ग्लोबल वातावरणात आजचा विद्यार्थी नेमका घडवायचा कसा, तंत्रज्ञानाचा शिक्षण क्षेत्रात नेमका कसा उपयोग करायचा इ. प्रश्न आपल्यासमोर आज दिसत आहे.

आज स्पर्धेच्या युगात माहिती आणि तंत्रज्ञान यात होत असलेली प्रगती इंटरनेट व नेटवर्किंगमुळे तर जागतीक व स्थानिक साधन संपत्तीचा व्यवस्थितीत उपयोग करून विकासाकडे वाटचाल शक्य आहे. कारण आज टेलीकॉन्फरन्स् आणि संगणकामुळे परदेशातील डॉक्टरांच्या सुचना व मार्गदर्शनाने स्थानिक डॉक्टर एखादे कठीण वाटणारे आव्हान सहजपणे स्विकारुन त्यामध्ये यशस्वी होऊ शकतो अगदी त्याचप्रमाणे हा प्रकार आपल्याला शैक्षणिक क्षेत्रात देखील अनुभवता येईल जगातील अभ्यासू आणि व्यासंगी शिक्षकांच्या ज्ञानाचा लाभ जगातील असंख्य विद्यार्थी एकाच वेळी घेऊ शकतात शिक्षणातील आधुनिकी करणामुळे जागतीक दर्जाचे अध्यापन आज शक्य झाले आहे.

●●●

ISBN 978-93-84093-89-1

अथर्व पब्लिकेशन्स्
Visit us... www.atharvapublications.com

Scanned with CamScanner